।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड . ४३१६०६ (महाराष्ट्र)

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

"Dnyanteeerth", Vishnupuri, Nanded – 431606 (Maharashtra)

Establishment on 17th September 1994 – Recognized by theUGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

## ACADEMIC (AFFILIATION) SECTION

**Phone: (02492) 229242/43** **Fax : (02462) 229574**

**Website: srtmun.ac.in** **e-mail: affi.srtmun@gmail.com**

जा.क्र.शैक्षणिक / संलग्न / ०३ / २०१७—१८ / 3403 दि. ०२ / ०५ / २०१८ 03

प्रति

मा. प्राचार्य

सर्व संलग्नीत महाविद्यालय

प्रस्तुत विद्यापीठ

विषय: स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा शै.व. २०१९—२० ते २०२३—२४ या कालावधीचा पंचवार्षीक बृहत आराखडयाच्या अनुषंगाने सूचना कळविणे बाबत

महोदय,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अन्वये व मा. डॉ नरेंद्र जाधव समितीच्या अहवालातील ध्येय धोरणे व निकष यांना अनुसरुन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचा शै.व. २०१९—२० ते २०२३—२४ या कालावधीचा पंचवार्षीक सर्वसमावेशक बृहत आराखडा तयार करावयाचा आहे. याबाबत वृत्तपत्रात मार्च २०१८ मध्ये जाहीर प्रगटनाद्वारे प्रसिध्दी देण्यात आलेली आहे.

सदर बृहत आराखडा तयार करताना केंद्र सरकारचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०१६, राज्य शासनाचे उन्नत महाराष्ट्र अभियान, मेक इन महाराष्ट्र, नजिकच्या काळात देशात व राज्यात स्थापित होणारे उद्योग, त्यासाठी आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ यासाठी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समाविष्ठ करावयाच्या बाबी, कौशल्य विकास, नाविन्यपूर्ण, अपारंपारिक व रोजगाराभिमुख अभ्यासक्रम इत्यादीचा समावेश बृहत आराखडयात करावायाचे प्रस्तावित आहे. त्यानुषंगाने नविन महाविद्यालय, नविन अभ्यासक्रम, विद्याशाखा, विषय, तुकडी सुरु करण्याबाबत आपणाकडून मौल्यवान सूचना मागविण्यांत येत आहेत.

आपल्या विद्यापीठाचा सदरील बृहत आराखडा अधिक दर्जेदार व सर्व समावेशक होण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या अमूल्य सूचना व अनुभव पाठविल्यास या परिक्षेत्रातील विद्यार्थी व एकूणच शैक्षणिक दर्जा सुधारण्यास मदत होईल. **तरी आपल्या मौल्यवान सूचना विद्यापीठाच्या** affi.srtmun@gmail.com **या ई—मेलवर किंवा पत्राद्वारे दिनांक १५.०५.२०१८ पर्यंत पाठवाव्यात ही विनंती**

आपला विश्वासू,

कुलसचिव